साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३४ वा | सोमवार, दि. ०७/०९/२०२६ ते दि. १३/०९/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्रातील ९ गुणवंत शिक्षकांचा सन्मान

नवी दिल्ली – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम, गुणवत्तापूर्ण अध्यापन, संशोधन आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील ९ गुणवंत शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ ने गौरव करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभाग आणि उच्च शिक्षण विभाग तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. देशभरातील ४८ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक आणि १३ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षक, अशा एकूण ८२ शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पुरस्कारार्थींना प्रमाणपत्र, पदक आणि ५० हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव अनिल कुमार, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्षकांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, चारित्र्याला आणि विचारांना आकार देऊन सशक्त राष्ट्राची पायाभरणी करतात, असे त्यांनी सांगितले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या स्मृतीस अभिवादन करताना राष्ट्रपतींनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, रवींद्रनाथ टागोर आणि गोपाळबंधू दास यांच्या शैक्षणिक योगदानाचा विशेष उल्लेख केला. अंदमान-निकोबारपासून लडाखपर्यंत दुर्गम आणि ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीत कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पणाचे त्यांनी कौतुक केले. भारताला जगाची ज्ञान आणि कौशल्याची राजधानी बनविण्यासाठी प्राथमिक स्तरापासूनच तंत्रज्ञान, नैतिक मूल्ये आणि कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहनही राष्ट्रपतींनी केले. शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि कौशल्य विकास या तीनही क्षेत्रांत महाराष्ट्रातील या शिक्षकांनी आपल्या कार्यातून शिक्षणाच्या गुणवत्तेला नवी दिशा देतानाच वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना, संशोधन आणि रोजगाराभिमुख कौशल्यनिर्मिती यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.



## शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत जीवनाची दिशा देतात-पालकमंत्री जयकुमार रावल

## दोंडाईच्यात २७ आदर्श शिक्षकांचा पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते गौरव

दोंडाईचा (जिमाका वृत्त)– शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून जीवनाला योग्य दिशा देतात. आई-वडिलांनंतर विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून शाळांमधून चांगल्या विद्यार्थ्यांसोबतच संवेदनशील, जबाबदार आणि कर्तव्यदक्ष नागरिक घडविण्याचे काम शिक्षकांनी करावे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. दोंडाईचा-वरवाडे नगरपरिषद प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शहरातील विविध शाळांमध्ये उल्लेखनीय शैक्षणिक कार्य करणाऱ्या २७ शिक्षकांचा पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पालकमंत्री श्री. रावल यांनी माजी राष्ट्रपती तथा थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षक दिन हा केवळ पुरस्कार प्रदान करण्याचा दिवस नसून भावी पिढी आणि पर्यायाने समाज घडविणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले.

दोंडाईचा शहरातील प्रत्येक शाळेतून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका शिक्षकाची निवड करून त्यांचा गौरव करण्याचा नगरपरिषदेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे नमूद करून पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, एका शिक्षकाचा गौरव हा संपूर्ण शिक्षकवर्गाच्या कार्याचा सन्मान आहे. शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वेगाने वाढत असला, तरी विद्यार्थ्यांना संस्कार, मूल्ये आणि योग्य दिशा देण्यात शिक्षकांची भूमिका कायमच महत्त्वपूर्ण राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालिका आणि शिक्षण विभागाने समन्वयाने काम करावे. शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव असलेली आणि जबाबदार पिढी घडविणे हे आपले सामूहिक उद्दिष्ट असले पाहिजे, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करताना हा सन्मान त्यांना भविष्यात आणखी उत्कृष्ट कार्य करण्यासाठी प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

२७ आदर्श शिक्षकांचा गौरव – यावेळी प्रदीप शिवदास पाटील, शेख साजिद दाऊद खाटीक, मनीषा श्रीराम पाटील, संजय सुकनंदन चौधरी, हबीबु रेहमान हुसेन अहमद अन्सारी, संदीप रामा ईशी, मनीषा मधुकर बंजारा, शेख मुश्ताक शेख कमरुद्दीन, दीपक आधार कोल्हाटी, संगीता पाडवी, शेख तौफिक अहमद शेख रफिक, प्रदीप नामदेव सूर्यवंशी, भाऊसाहेब गोरेख पाटील, निळकंठ देविदास कुलकर्णी, मनोजकुमार ठाकूर, ललित संतोष कंवर, उर्मिला रविंद्र पाटील, प्रविण दिगंबर माळी, सचिन पाटील, सुंदरी विघ्नेश अबीरामी, सुचिता भट्ट पवार, फरहाना तसवर पिंजारी, जयसिंग हिम्मतसिंग गिरासे, अशोक खंडू



सावंत, सुरेंद्रसिंग दौलतसिंग गिरासे, कोकेंद्र ताराचंद वाडीले आणि मनीषा तानाजी घुगे यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती – कार्यक्रमास उपनगराध्यक्ष विजय पाटील, शिक्षण सभापती वैशाली कागणे, भाजपचे दोंडाईचा शहराध्यक्ष जितेंद्र गिरासे, प्रवीण महाजन, कृष्णा नगराडे, जितू गिरासे, भैया धनगर, अक्षय चव्हाण, सचिन सोनवणे, संजय रामुडे, निखिल राजपूत, बांधकाम सभापती मुकेश देवरे, माजी नगराध्यक्ष रमेश कुकरेजा, भरत ठाकूर, राकेश अग्रवाल, माजी नगराध्यक्ष विक्रम पाटील, मुख्याधिकारी देवेंद्र परदेशी, हितेंद्र महाले यांच्यासह शिक्षक, शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शिक्षकांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमामुळे शिक्षकवर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## आर. सी. पटेल महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी 'बदलत्या काळातील जाण व भान' विषयावर ८ सप्टेंबर रोजी एकदिवसीय कार्यशाळा

शिरपूर – येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वयातील संक्रमणाच्या काळात होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक बदल याबाबत योग्य समज व जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने बदलत्या काळातील जाण व भान या विषयावर दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. वयातील संक्रमणाच्या काळाबाबत समाजात योग्य समज निर्माण करणे, गैरसमज दूर करणे आणि आरोग्यदायी व आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक ती जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. युवावस्था ही व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्वाची संक्रमणावस्था असून, या काळात शरीर, मन, भावना आणि सामाजिक वर्तनामध्ये विविध बदल घडून येतात. या बदलांकडे योग्य दृष्टिकोनातून पाहणे आणि त्याबाबत वैज्ञानिक व आरोग्यविषयक माहिती मिळणे आजच्या काळात अत्यंत आवश्यक आहे.

याच अनुषंगाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये साने गुरुजी कर्मभूमी स्मारक प्रतिष्ठानच्या कार्यवाहक **(पान २ वर)**

# अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये विद्यार्थ्यांसाठी हाऊस अंतर्गत कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरपूर – हॉकीचे महान खेळाडू आणि भारताचे दिग्गज क्रीडापटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त देशभरात साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये विद्यार्थ्यांसाठी हाऊसअंतर्गत कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण तसेच निरोगी स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्याच्या उद्देशाने शाळेतील अँबर हाऊस, रुबी हाऊस, एमराल्ड हाऊस आणि सफायर हाऊस या चारही हाऊसमध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. चारही हाऊसच्या संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अटीतटीच्या आणि चुरशीच्या सामन्यांमध्ये अँबर हाऊस संघाने प्रथम क्रमांक, रुबी हाऊस संघाने द्वितीय क्रमांक, तर एमराल्ड हाऊस संघाने तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी संपूर्ण स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट शिस्त, संघभावना, खिलाडूवृत्ती आणि परस्पर सहकार्याचे दर्शन घडविले. या स्पर्धेसाठी शिरपूर एज्युकेशन सोसायटी व एस.व्ही.के.एम. क्रीडा समन्वयक कुणाल सुर्वे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे क्रीडा प्रशिक्षक भूषण कोळी यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.




कुणाल सुर्वे यांनी खेळाडूंचे कौतुक करताना खेळामध्ये शिस्त, सातत्य, संघभावना आणि खिलाडूवृत्ती यांचे महत्त्व स्पष्ट केले. अनुकूल व प्रसन्न हवामानात पार पडलेल्या या स्पर्धेमुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे व्यवस्थापन, क्रीडा विभाग, शिक्षकवृंद, परीक्षक तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# आर. सी. पटेल महाविद्यालयात आर्थिक कल्याण वृद्धी विषयक प्राध्यापक अभिमुखता कार्यक्रम संपन्न

शिरपूर – आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर येथील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाच्या वतीने नुकताच फॅकल्टी ओरिएंटेशन प्रोग्राम ऑन फायनान्शियल वेलनेस एन्हान्समेंट आणि वेलनेस टू वेल्थ या विषयांवर विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न झाला. आर्थिक सुदृढतेसाठी आर्थिक नियोजन व गुंतवणुकीचे महत्त्व लक्षात घेऊन, सेबीअंतर्गत सीएसआर उपक्रमाच्या सहकार्याने पुणे येथील ड्वायझर्स स्किल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन आणि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ३१ ऑगस्ट २०२६ रोजी हा कार्यक्रम दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आला.

आर्थिक साक्षरता वाढविणे, गुंतवणुकीबाबत जागरूकता निर्माण करणे आणि सहभागी व्यक्तींना आर्थिक नियोजनाचे व्यावहारिक ज्ञान उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी गुंतवणूकदार जागृती प्रशिक्षक तथा प्रमुख वक्ते हितार्थ शाह, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. हितेंद्र महाजन, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. एम. पाटील, प्रा. डॉ. आर. डी. जाधव, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. शुभांगी पिंगळे, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापनशास्त्र प्रमुख प्रा. मानसी वैद्य यांनी केले. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. शुभांगी पिंगळे यांनी आर्थिक सुदृढता, मिळणाऱ्या उत्पन्नाचे योग्य व्यवस्थापन, भविष्यासाठी नियोजन आणि वर्तमान जीवनात आर्थिक आत्मविश्वास निर्माण होणे याविषयीचा संदेश दिला. पहिल्या सत्रात हितार्थ शाह यांनी आर्थिक बाजारपेठ, गुंतवणूकदार शिक्षण, विविध म्युच्युअल फंड संस्थांसाठी गुंतवणूकदार जागृती, तांत्रिक विश्लेषण, मागणी व पुरवठा, ऑप्शन्स ट्रेडिंग, मालमत्ता वाटप, विविधीकरण, निवृत्ती नियोजन, बचत आणि कुटुंबाचे आर्थिक संरक्षण या विविध क्षेत्रांबाबत मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात 'वेलनेस टू वेल्थ' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रात लिक्विडिटी फंड्स, जोखीम व्यवस्थापन,



गुंतवणुकीचा खर्च आणि आर्थिक स्वातंत्र्य यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर माहिती देण्यात आली. लवकर गुंतवणूक सुरू करणे, नियमित बचतीची सवय लावणे आणि दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांचे नियोजन करणे यांचे महत्त्व वक्त्यांनी अधोरेखित केले. दैनंदिन खर्चांचे योग्य व्यवस्थापन करून बचत कशी करावी आणि भविष्यातील आर्थिक गरजांसाठी नियोजन कसे करावे, याबाबत व्यावहारिक मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख वक्ते, महाविद्यालयाचे पदाधिकारी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, आयोजन समिती आणि सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले.

या कार्यक्रमाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. हितेंद्र महाजन, उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. शुभांगी पिंगळे आणि व्यवस्थापनशास्त्र प्रमुख प्रा.मानसी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी प्रा. आदेश जैन, प्रा. प्रतिमा श्रावगी, प्रा. शबनम पिंजारी, प्रा. पियुष सोनार आणि प्रा. कामिनी चौधरी यांनी विशेष सहकार्य केले.

# आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा



शिरपूर – शहरातील आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बालवाडी ते इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक प्रदीप गहीवरे यांनी श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन केले. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बाललीला, राधा–कृष्णाच्या वेशभूषा तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या मनमोहक वेशभूषेमुळे संपूर्ण शाळेचे वातावरण कृष्णमय झाले.

श्रीकृष्णाच्या गोविंदा आला रे आला या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने गोपाळकाल्याचे महत्त्व जाणून घेत आनंदाने या उत्सवात सहभाग घेतला. सामूहिक सहभाग, एकोप्याची भावना आणि आनंदाचे वातावरण यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. एकीमध्ये शक्ती आणि सहभागातून आनंद हा संदेश विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून अनुभवला. बालवाडी ते इयत्ता चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, आकर्षक वेशभूषा आणि आनंदी वातावरण यामुळे श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला कार्यक्रम संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षकवृंद व सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# मुकेशभाई आर. पटेल सैनिकी शाळेत हिंदी सप्ताहात राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त यांच्या साहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय

शिरपूर – मुकेशभाई आर. पटेल मुला–मुलींची सैनिकी शाळा, तांडे येथे १ ते ५ सप्टेंबर दरम्यान राष्ट्रभाषा हिंदी सप्ताह मोठ्या उत्साहात व अनोख्या उपक्रमाने साजरा केला जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभाषेविषयी आदर आणि साहित्याची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेच्या दैनंदिन परिपाठात दररोज हिंदी साहित्यातील नामवंत लेखक व कवींच्या जीवनपटाचा व साहित्यकृतींचा परिचय करून देणारा ज्ञानयज्ञ सुरू आहे.

यासाठी प्राचार्य दिनेशकुमार राणा यांचे मार्गदर्शन लाभले. सप्ताहाच्या चौथ्या दिवशी दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी जन्माष्टमी तथा हिंदी सप्ताहाचे औचित्य साधून विद्यालयाच्या भव्य प्रांगणात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मराठी शिक्षक शरद पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा आणि त्यांच्या गौरवशाली साहित्यकृतींचा सविस्तर परिचय करून दिला. राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त यांच्या काव्यधारेवर प्रकाश टाकला. रामायणातील उपेक्षित पात्र असलेल्या लक्ष्मणाच्या पत्नी उर्मिला यांच्या त्यागमय जीवनावर व व्यथांवर आधारलेल्या गुप्तजींच्या प्रसिद्ध साकेत या महाकाव्याची महती विद्यार्थ्यांना उलगडून सांगितली. एका हिंदी सप्ताहनिमित्ताने पूर्ण विद्यालयात हिंदीमय वातावरण तयार झाले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी आणि हिंदी भाषेच्या समृद्ध वारशाची ओळख व्हावी, यासाठी या सप्ताहनिमित्त दररोज विविध शिक्षकांच्या माध्यमातून एका थोर साहित्यिकाचा जीवनप्रवास व प्रमुख रचनांची माहिती दिली जात असून, या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे. याप्रसंगी प्राचार्य दिनेशकुमार राणा, शिक्षक नंदकिशोर बाविस्कर, यतीन पाटील, सैनिकी निर्देशक मनोज पाटील, शशिकांत जाधव, चैताली बागुल, सुवर्णा माळी तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

(पान १ वरून) **एकदिवसीय कार्यशाळा**

सौ. दर्शना पवार या प्रमुख वक्त्या म्हणून विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत केवळ मार्गदर्शनच नव्हे, तर विद्यार्थिनींसाठी संवादात्मक सत्रे, खुली चर्चा आणि प्रश्नोत्तरांचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. ज्यामुळे त्यांच्या मनातील विविध शंकांचे योग्य निरसन होण्यास मदत होईल. विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच तरुण वयातील मुलींच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हितेंद्र महाजन, उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव आणि कार्यक्रमाच्या समन्वयिका डॉ. जे. पी. महाशब्दे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# १८९७चा प्लेग

**विशेष लेख...**

सध्याच्या दिवसांत Epidemic Diseases Act, 1897. याचा उल्लेख वारंवार होतो आहे. कोरोना महामारी च्या पार्श्वभू मीवर सरकारने हा कायदा पुन्हा एकदा लागू केला आहे. हा कायदा ब्रिटिश सरकारने १८९७ साली प्लेगच्या नियंत्रणार्थ आणला होता. या प्लेगच्या पाऊलखुणा मराठी इतिहास–साहित्य–कलाविश्वात उमटलेल्या दिसतात. सर्वांत आधी आठवतो तो २२ जून १८९७ हा चित्रपट. चापेकर बंधूंनी केलेल्या रँडच्या खुनामागे लोकमान्य टिळकांची प्रेरणा होती, असा आरोप करून टिळकांवर राजद्रोहाचा पहिला खटला चालला आणि त्यांना १८ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली.

केसरीचे माजी संपादक अरविंद व्यं गोखले यांनी लिहिलेल्या 'मंडालेचा राजबंदी' या पुस्तकात या सगळ्या कालखंडाबद्दल लिहिले आहे. त्या आठवणी आजच्या काळाशीही समर्पक वाटतात. १८९६ सालच्या दुष्काळात जनता होरपळत असतानाच प्लेगच्या संकटाची भर पडली. हाँगकाँगहून (म्हणजे पुन्हा चीनमधून) आलेल्या धान्याच्या पोत्यांबरोबर प्लेगचे उंदीरही मुंबई बंदरात उतरले. मुंबईत साथ पसरली, न्यायालये , सरकारी कार्यालये बंद झाली. गाड्या भरभरून माणसे गुजरातकडे रवाना होऊ लागली. काही सरकारी नजर चुकवून पुण्यात आली. ऑक्टोबर १८९६ मध्ये पुण्यात प्लेगचा पहिला रुग्ण सापडला आणि आजार पाहता पाहता पसरला.

टिळकांनी केसरीतून प्लेगबद्दल माहितीपर मजकूर छापायला सुरुवात केली. लोकांनी काळजी घ्यायला हवी, बेपर्वाई सोडायला हवी. असे सांगितले. हिंदुस्तानात प्लेग येउ नये यासाठी प्रयत्न करण्यात सरकार कमी पडले, तरी आता प्रसार रोखण्यासाठी केलेल्या उपायांना टिळकांनी पाठिंबा दिला. टिळकांना तेव्हाही लोकांना नागरिक शास्त्राचे धडे द्यायची गरज भासली होती. सुशिक्षित, पुढारलेल्या लोकांनी प्लेग निवारणाच्या कामात पुढे यावे, आजूबाजूच्या लोकांना मदत करावी हे त्यांनी खडसावून सांगितले.

प्लेग प्रतिबंधासाठी सातार्‍याहून पुण्यात आणवलेल्या रँडने नदीपलीकडे प्लेगग्रस्तांसाठी संसर्गरोध छावणी (क्वारंटाइन) उभारली. रुग्णांना वेगळे काढणे , ते सापडलेल्या ठिकाणी स्वच्छता करणे ही कामे त्याने आरंभली. या उपायांनी पुढे सक्तीचे रूप घेतले. स्वच्छता करण्याची मजल चीजवस्तू घरेदारे जाळण्यापर्यंत गेली.

छावण्यांमध्ये खाण्यापिण्याची सोय नसल्याने प्लेगच्या जोडीने लोक उपासमारी आणि रोग प्रतिकारकशक्ती कमी होऊन मरू लागले. त्यामुळे लोक रुग्णाला छावणीत पाठवायला कचरू लागले. परिणामी सरकारने दंडुकेशाही आरंभली. लोकांमध्ये अस्वास्थ्य उत्पन्न होऊन अरिष्ट निवारण्याकरता योजलेले हेच एक दुसरे अरिष्ट अशी स्थिती झाली. सरकारच्या उपायांमध्ये दुष्टावा नसेल, पण माणुसकीचा ओलावा नव्हता. एकीकडे प्लेगचे वाढते प्रमाण, मृतांची वाढती संख्या आणि त्यात उपायांच्या नावाखाली अत्याचार यामुळे जनतेत असंतोष निर्माण होऊ लागला. काखेतले गोळे तपासण्यासाठी मुस्लिम स्त्रियांचे बुरखे फाडणे, हिंदू स्त्रियांना उत्तरांगावरची वस्त्रे काढून ठेवण्यास सांगणे, असे प्रकार होऊ लागले.

मुंबईत नसली तरी पुण्यात मोर्हमच्या मिरवणुकीवर बंदी घातली गेली. या बंदीला टिळकांनी जुलूम म्हटले. पुण्यात रास्तापेठेत अपरात्री जाऊन धुमाकूळ घालणार्‍या पाचदहा सोजिरांना पुणेकरांनी चोप दिला. त्यात एका सोजिराचा मृत्यू झाला. दुष्काळात प्लेगची भर पडल्याने लोकांची अन्नान्न दशा होऊ लागली. रँडशाहीचा कडेलोट होऊ लागला तशी टिळकांनी त्यावर टीका सुरू केली. त्या वेळची इंग्रजी वृत्तपत्रे मात्र ब्रिटिश सरकारच्या जुलुमावर लिहिण्यापेक्षा सरकारची तळी उचलत टिळकांवर टीका करण्यात – प्रक्षोभक, चिथवणीखोर अशी विशेषणे लावण्यात धन्यता मानीत होती.

लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रे या आत्मकथनात प्लेगच्या मोजक्या आठवणी आहेत. कसल्याही संकटात विनोदवृती जागृत ठेवणार्‍या लक्ष्मीबाई तेव्हा नगर येथे होत्या. त्यां चे आयुष्य बिर्‍हाडे बदलण्यातच गेले. प्लेगबद्दल त्या म्हणतात की विघ्नहर्त्यानेच आपल्या वाहनास आज्ञा केली यांना आता इथून हलवा. एक दिवस दत्तू व त्या जेवत असताना एक मोठा उंदीर दत्तूच्या ताटाजवळील चित्रावती खाऊ लागला. यावर लक्ष्मीबाई म्हणतात – नगरचे उंदीर भीत नाहीत बरं का! दोघे उठले तसे आणखी एक उंदीर येऊन चित्रावती खाऊ लागला. थोड्याच वेळात दोघे उंदीर गरगर फिरू लागले व पटकन मेले. त्यांची परीक्षा करून ते प्लेगचे उंदीर आहेत हे कळल्यावर घर सोडणे आले. लक्ष्मीबाईंची सोय जिथे सर्व स्त्रियाच होत्या अशा एका वाडीत झाली.

रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या पुस्तकातही प्लेगचे उल्लेख आहेत. त्यांच्या धान्याच्या कोठीत मेलेले उंदीर मिळू लागले. पण त्यांचे एकदोन नोकर प्लेगने आजारी पडल्यावरच हे उंदीर प्लेगचे आहेत, हे त्यांना कळले. न्या. रानडे आपल्या नोकरांचीही कुटुंबीयांसारखीच काळजी घेत. त्यांची स्वतःची प्रकृतीही तोवर उतरणीला लागली होती. अशात त्यांनी स्वतःवर अधिक त्रास ओढवून घेऊ नये म्हणून रमाबाईंनी एक नोकर आजारी पडल्याची गोष्ट होताहोईतो न्या. रानड्यांपासून लपवून ठेवली. आतापावेतो प्रत्येक गोष्ट पती सांगतो केवळ म्हणून, पतीच्या सांगण्यानुसार करणार्‍या रमाबाई पहिल्यांदाच स्वतः काही ठरवताना आणि करताना दिसल्या.

चौथी आणि अतिशय हृदयद्रावक आठवण सावित्रीबाई फुले यांच्याबद्दलची आहे. त्यांनी आपला दत्तक मुलगा डॉक्टर यशवंतवतराव याला पुण्याजवळ प्लेगच्या उपचारांसाठी दवाखाना काढायला सांगितले. त्या स्वतः जाऊन रुग्णांना घेऊन येत आणि दवाखान्यात भरती करत. ६६ वर्षांच्या सावित्रीबाईंनी एका दहा वर्षांच्या रुग्ण मुलाला बर्‍याच दूरवरून पाठंगुळीला घेऊन आणून दवाखान्यात भरती केले. तो मुलगा तर वाचला. पण प्लेगच्या संसर्गाने सावित्रीबाईंचा बळी घेतला. पुढे १९०५ मध्ये नगरमध्ये प्लेगची साथ आली असताना यशवंतरावांनी तिथे दवाखाना काढला आणि रुग्णसेवा करताना संसर्ग होऊन त्यांचा मृत्यू झाला.

# संगमनेरकरांच्या अभिप्रेत असलेलेच छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य–दिव्य स्मारक उभारणार!

संगमनेर– छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हा संगमनेर शहरासाठी केवळ एक विकास प्रकल्प नसून, तो प्रत्येक संगमनेरकराच्या अस्मितेचा, श्रद्धेचा आणि स्वाभिमानाचा विषय आहे. त्यामुळे संगमनेरकरांच्या मनात ज्या स्वरूपाचे स्मारक आहे, त्यांच्या ज्या अपेक्षा आहेत, त्याला पूर्णपणे न्याय देणारे भव्य–दिव्य, दिमाखदार आणि पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे स्मारकच उभारण्यात येईल. स्मारकाच्या उभारणीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही आणि त्यासाठी नगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी स्पष्ट भूमिका माजी नगराध्यक्ष दिलीपशेठ पुंड यांनी व्यक्त केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. महाराजांनी स्वराज्याची स्थापना करताना दिलेला स्वाभिमान, लोककल्याणकारी राज्यकारभार, सर्वधर्मसमभाव, दूरदृष्टी आणि रयतेप्रती असलेली बांधिलकी आजही प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे संगमनेरमध्ये उभारण्यात येणारे महाराजांचे स्मारक हे केवळ पुतळा किंवा वास्तू म्हणून मर्यादित न राहता, महाराजांच्या कर्तृत्वाची आणि विचारांची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणारे केंद्र असावे, अशी संगमनेरकरांची भावना आहे. ही भावना लक्षात घेऊनच नगरपालिकेकडून स्मारकाचे नियोजन करण्यात येत आहे.

स्मारकासाठी आवश्यक असलेल्या वाढीव जागेचा प्रश्न गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित आहे. मात्र या दीड वर्षांच्या काळात परिवहन तसेच नगरविकास खाते आपल्याच ताब्यात असतानाही संबंधितांकडून हा प्रश्न मार्गी का लावण्यात आला नाही, असा सवाल दिलीपशेठ पुंड यांनी उपस्थित केला. शहराच्या विकासाशी थेट संबंधित असणारे नगरविकासासारखे अत्यंत महत्त्वाचे खाते आणि त्यासोबत परिवहन खाते हातात असताना, स्मारकासाठी आवश्यक वाढीव जागेचा विषय शासनस्तरावर सोडवण्यासाठी पुरेसा कालावधी आणि संधी उपलब्ध होती. तरीही हा प्रश्न प्रलंबित राहिला, याचे उत्तर आधी संगमनेरकरांना दिले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

गेल्या दीड वर्षात वाढीव जागेसाठी ठोस निर्णय घेता आला नाही आणि आता नगरपालिका छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे प्रत्यक्ष काम पुढे नेण्याचा प्रयत्न करत असताना त्यावर आक्षेप उपस्थित करणे, हा मोठा विरोधाभास आहे. स्मारकाच्या कामाला गती मिळत असताना त्यामध्ये अडथळे निर्माण करण्यापेक्षा किंवा नागरिकांच्या मनामध्ये गैरसमज निर्माण करण्यापेक्षा, स्मारक अधिक भव्य आणि सुंदर कसे होईल यासाठी सर्वांनी एकत्रितपणे सहकार्य करणे आवश्यक आहे, असे पुंड यांनी स्पष्ट केले. आमदार सत्यजीत तांबे यांनी यापूर्वीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी स्पष्ट भूमिका घेतली असून, स्मारकाच्या उभारणीसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. संगमनेरकरांच्या भावनांना न्याय देणारे आणि शहराच्या वैभवात भर घालणारे स्मारक उभारले जावे, यासाठी आवश्यक त्या स्तरावर प्रयत्न करण्यात आले आहेत. त्यानंतर नगरपालिकेनेही स्मारकाच्या प्रत्यक्ष उभारणीच्या दृष्टीने आवश्यक नियोजनाला सुरुवात केली आहे. त्यामुळे आता या विषयाला राजकीय वादाचे स्वरूप न देता प्रत्यक्ष कामाला गती मिळणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. स्मारकाचे नियोजन करताना केवळ आजचा विचार केला जाणार नाही, तर पुढील अनेक दशकांचा आणि शहराच्या वाढत्या विस्ताराचाही विचार केला जाणार आहे. स्मारकाचा परिसर प्रशस्त, आकर्षक आणि नागरिकांसह शहरात येणाऱ्या पर्यटकांसाठीही प्रेरणादायी ठरावा, यासाठी नियोजन केले जाईल. महाराजांच्या स्मारकाची भव्यता, परिसराचे सुशोभीकरण, नागरिकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतुकीचे नियोजन तसेच भविष्यातील गरजा या सर्व बाबींचा एकत्रित विचार करण्याची नगरपालिकेची भूमिका आहे. अतिरिक्त जागेचा उपयोग स्मारक अधिक भव्य करण्यासाठी, परिसर अधिक प्रशस्त करण्यासाठी तसेच सुशोभीकरण आणि अन्य आवश्यक सुविधांसाठी नियोजनबद्ध पद्धतीने केला जाईल. त्यामुळे वाढीव जागा नगरपालिकेला मिळालीच व ती जागा उपलब्ध करून देण्यासाठी ज्यांच्याकडे संबंधित खाती आणि अधिकार आहेत त्यांनी पुढाकार घ्यावा. मात्र वाढीव जागेचा विषय पुढे करून सध्या सुरू असलेल्या स्मारकाच्या प्रक्रियेला थांबवण्याचा किंवा त्यामध्ये खोडा घालण्याचा प्रयत्न योग्य ठरणार नाही, असेही पुंड यांनी स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर राजकारण करण्याऐवजी त्यांच्या स्मारकासाठी सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. दीड वर्षे संधी आणि संबंधित खाती हातात असताना वाढीव जागेचा प्रश्न सोडवला गेला नाही आणि आता नगरपालिका प्रत्यक्ष कामाला लागल्यानंतर त्याच मुद्द्यावरून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर संगमनेरकर ते स्वीकारणार नाहीत. संगमनेरची जनता सुज्ञ असून, कोण स्मारकाचे काम पुढे नेण्यासाठी प्रयत्न करत आहे आणि कोण त्यामध्ये अडथळे निर्माण करत आहे, हे नागरिकांना चांगले समजते, असे पुंड म्हणाले.

या विषयामध्ये आरोप–प्रत्यारोप करण्यापेक्षा छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अधिक भव्य, आकर्षक आणि प्रेरणादायी कसे करता येईल, यासाठी प्रत्येकाने आपापल्या स्तरावर योगदान देणे गरजेचे आहे. वाढीव जागा मिळवून देणे शक्य असेल तर त्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करावेत. नगरपालिकाही त्यासाठी आवश्यक ते सहकार्य करेल. मात्र जागेच्या नावाखाली स्मारकाचे प्रत्यक्ष काम रखडता कामा नये, अशी स्पष्ट भूमिका नगरपालिकेची आहे.

संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ओळखीचा आणि अभिमानाचा भाग म्हणून हे स्मारक विकसित करण्याचा मानस आहे. भविष्यात संगमनेरमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या स्मारकातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची जाणीव व्हावी आणि प्रत्येक संगमनेरकराला या स्मारकाकडे पाहताना अभिमान वाटावा, या दृष्टीने त्याची उभारणी केली जाईल. स्मारक हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे तर असेलच, परंतु नव्या पिढीला महाराजांचा इतिहास, त्यांचे विचार आणि आदर्श यांची प्रेरणा देणारेही ठरेल. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा पक्षाचा विषय नाही; हा संपूर्ण संगमनेरचा विषय आहे. त्यामुळे त्यात राजकारण न आणता संगमनेरकरांच्या अपेक्षेप्रमाणे सर्वांनी मिळून भव्य–दिव्य स्मारक उभारण्यासाठी योगदान द्यावे. नगरपालिका या कामात कोणतीही कमतरता ठेवणार नाही. वाढीव जागा उपलब्ध झाली तर तिचाही योग्य वापर केला जाईल आणि संगमनेरकरांच्या मनातील स्मारकच प्रत्यक्षात साकारले जाईल, असा विश्वास दिलीपशेठ पुंड यांनी व्यक्त केला. संगमनेरकरांच्या भावना, शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक लौकिक तसेच पुढील पिढ्यांच्या अपेक्षा लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे हे स्मारक संगमनेरची नवी ओळख आणि प्रत्येक संगमनेरकराचा अभिमान ठरेल, अशाच भव्य स्वरूपात उभारण्यासाठी नगरपालिका पूर्ण क्षमतेने काम करणार असल्याचेही दिलीपशेठ पुंड यांनी स्पष्ट केले.

# भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित

## विद्यमान परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून शासनास सुधारणा सुचविणार

मुंबई – राज्य शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित, विश्वासार्ह, निष्पक्ष आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी विद्यमान परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्याकरिता उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १२ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील भरती परीक्षा पद्धतीचे संपूर्ण पुनर्विलोकन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) श्रीमती व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीमध्ये पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मुंबई येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगट्टे यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी हे समितीचे सदस्य सचिव असतील. परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास – राज्य शासनाचे विविध विभाग, प्राधिकरणे आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या भरती परीक्षांच्या विद्यमान प्रणाली व कार्यपद्धतीचा समिती आढावा घेईल. भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व निष्पक्ष करण्यासाठी सर्वंकष उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षण व मॉडरेशन, एकापेक्षा अधिक प्रश्नसंचांची निर्मिती, मुद्रण किंवा डिजिटल वितरण, गोपनीयता, अभिरक्षा, प्रश्नपत्रिकांची वाहतूक, परीक्षा संचालन, प्रतिसाद नोंदणी, मूल्यमापन आणि निकाल जाहीर करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियांचा अभ्यास करून योग्य सुरक्षा उपायांची शिफारस समिती करेल. परीक्षा प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञान, डिजिटल प्रणाली आणि सुरक्षा तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, लेखापरीक्षण नोंदी (ऑडिट ट्रेल्स), देखरेख तसेच अन्य तंत्रज्ञानाधारित सुरक्षा उपायांबाबतही समिती शिफारसी करणार आहे.

गैरप्रकारांना प्रतिबंधासाठी उपाय – प्रश्नपत्रिका फुटणे, गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत आणि प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर यांसारख्या अनुचित प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या यंत्रणेचा समिती आढावा घेईल. अशा गैरप्रकारांचा शोध घेणे, प्रतिबंधात्मक व पर्यवेक्षणात्मक उपाययोजना राबविणे आणि उत्तरदायित्व निश्चित करण्याबाबतही उपाय सुचविले जाणार आहेत. परीक्षा केंद्रांची निवड, पायाभूत सुविधा, देखरेख, सुरक्षा, मनुष्यबळ आणि कार्यसज्जता यांसाठी किमान मानके निश्चित करण्याबाबत समिती शिफारसी करेल. जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागातील प्राधिकरणे, परीक्षा घेणाऱ्या संस्था आणि अन्य संबंधित यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वयासाठी संस्थात्मक कार्यपद्धतीही सुचविण्यात येईल.

प्रत्येक महसुली विभागाला भेट – समिती राज्यातील प्रत्येक महसुली विभागाला भेट देऊन विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि अन्य संबंधित हितधारकांशी चर्चा व सल्लामसलत करेल. त्यांची मते आणि सूचना विचारात घेऊन परीक्षा पद्धतीतील सुधारणा सुचविण्यात येणार आहेत. आवश्यकता भासल्यास इतर राज्यांतील उत्तम पद्धती तसेच अन्य देशांतील परीक्षा प्रणालींचाही अभ्यास केला जाईल. प्रभावी तक्रार निवारण, उमेदवारांशी सुसंवाद आणि परीक्षा प्रक्रियेची निष्पक्षता व प्रामाणिकतेबाबत उमेदवारांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठीही समिती उपाय सुचवेल. संबंधित हितधारकांशी प्रत्यक्ष अथवा ऑनलाइन माध्यमातून संवाद साधून सूचना व अभिप्राय प्राप्त केल्यानंतर समिती सर्वसमावेशक अंतिम अहवाल शासनास सादर करणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२६०९०५१३५४४७३३०७ असा आहे.

# मागील तीन वर्षांच्या कामगिरीच्या आधारे श्रेणी निश्चित होणार

## उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुढील जबाबदाऱ्यांमध्ये प्राधान्य

मुंबई – सार्वजनिक आरोग्य विभागात कामगिरीआधारित प्रशासकीय कार्यसंस्कृती रुजविण्याच्या दृष्टीने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचे दरवर्षी वस्तुनिष्ठ पद्धतीने गुणांकन करण्यात येणार असून, मागील तीन वर्षांतील कामगिरीच्या आधारे त्यांची श्रेणी निश्चित केली जाणार आहे. या श्रेणीचा उपयोग जबाबदाऱ्यांचे वाटप, पुढील तीन वर्षांचे कार्यनियोजन, भविष्यातील नियुक्त्यांच्या वेळी केला जाणार आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य विभागात सेवाज्येष्ठतेसोबतच प्रत्यक्ष कामगिरी, नेतृत्वक्षमता, रुग्णसेवा, आर्थिक शिस्त, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांना महत्त्व मिळणार आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या क्षमतेनुसार त्यांना पुढील संधी देण्याची व्यवस्था निर्माण होणार असल्याने अधिकाऱ्यांचे मनोबल उंचावण्यासही मदत होणार आहे.

तीन वर्षांच्या कामगिरीचे 'रिपोर्ट कार्ड' – ३१ मार्च २०२६ रोजी किमान तीन वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या कामाची माहिती अद्ययावत करून त्यांचे गुणांकन केले जाणार आहे. सन २०२३–२४, २०२४–२५ आणि २०२५–२६ या तीन वर्षांतील पदावरील कामकाजाचा विचार करून एकूण १०० गुणांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. या गुणांकनानुसार अधिकाऱ्यांचे अ, ब, क आणि ड अशा चार श्रेणींत वर्गीकरण केले जाणार आहे. दरवर्षी ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. रुग्णसेवेपासून डिजिटल कामकाजापर्यंत ११ कसोट्या – अधिकाऱ्यांचे गुणांकन करताना केवळ कागदोपत्री कामकाजाचा विचार न करता जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेवर प्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. लोकाभिमुखता, तक्रार निवारण, नेतृत्वगुण, विशेष कौशल्य, प्रशिक्षण आणि संवादकौशल्य यांचा विचार केला जाणार आहे. जिल्हा वार्षिक नियोजन, राज्य लेखाशीर्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान (छक्ष्) आणि सीएसआर (उडठ) निधीचा प्रभावी वापर यासाठी केलेले आर्थिक व्यवस्थापनही तपासले जाणार आहे. आरोग्य संस्थांमधील आहार, औषधांचा पुरवठा, स्वच्छता आणि कंत्राटी मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर करून आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी केलेली कार्यवाहीही गुणांकनाचा भाग असेल. अधिनस्त रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमधील मनुष्यबळ व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्ती, साथीचे आजार व अपघातांच्या काळातील कामगिरीलाही महत्त्व दिले जाणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कार्यक्रमांची अंमलबजावणी, शासनाच्या विशेष अभियानांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव', अरुणोदय–सिकलसेलमुक्त महाराष्ट्र, पॅलेटिव्ह केअर अभियान आणि कर्करोगमुक्त महाराष्ट्र यांसारख्या उपक्रमांतील योगदानाचाही विचार केला जाणार आहे. त्यासोबतच आयुष्मान भारत कार्ड, आरोग्य विभागाच्या विविध पोर्टलवरील माहिती अद्ययावत करणे, महाकर्मी पोर्टलवरील कामकाज, एकत्रित आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी या डिजिटल व योजनाधारित कामगिरीलाही गुण दिले जाणार आहेत. पुढील तीन वर्षांत करावयाच्या कामांचे नियोजन याचाही विचार केला जाणार आहे. गुणवत्तेसोबत सचोटीलाही महत्त्व – अधिकाऱ्यांच्या नामनिर्देशनासाठीही स्पष्ट निकष निश्चित करण्यात आले आहेत. संबंधित अधिकारी जिल्हा शल्यचिकित्सक किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील आणि किमान तीन वर्षांची सेवा पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई प्रलंबित अथवा प्रस्तावित नसणे, अपहाराच्या प्रकरणात सहभाग नसणे आणि गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नसणे आवश्यक आहे. उत्कृष्ट चारित्र्य आणि निर्विवाद सचोटी हा देखील नामनिर्देशनाचा महत्त्वाचा निकष ठेवण्यात आला आहे. त्यामुळे केवळ कामाची आकडेवारी नव्हे तर अधिकाऱ्याची प्रशासकीय प्रतिमा आणि प्रामाणिकपणालाही महत्त्व मिळणार आहे. 'काम करणाऱ्याला संधी'चा स्पष्ट संदेश – सार्वजनिक आरोग्य विभागातील जिल्हास्तरीय यंत्रणेचे नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निर्णय क्षमतेचा थेट परिणाम नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्यसेवेवर होतो. त्यामुळे उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाची योग्य दखल आणि त्यानुसार पुढील संधी मिळावी, हा या निर्णयाचा केंद्रबिंदू आहे. या प्रक्रियेमुळे अधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण होऊन आरोग्य संस्थांचा दर्जा सुधारण्याबरोबरच रुग्णसेवा, योजनांची अंमलबजावणी आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढण्यास चालना मिळणार आहे. नियुक्त्या आणि जबाबदाऱ्यांच्या वाटपात गुणवत्ता व पारदर्शकतेला अधिक महत्त्व मिळणार असल्याने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कामकाजातही सकारात्मक बदल अपेक्षित आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक आरोग्य विभागात गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांना केंद्रस्थानी ठेवून प्रशासकीय सुधारणा करण्यावर भर दिला जात आहे. या प्रक्रियेला प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक आणि आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्या प्रशासकीय अनुभवाची साथ मिळणार आहे. तीन वर्षांची कामगिरी, १०० गुणांचे मूल्यांकन आणि स्पष्ट श्रेणीकरण यामुळे अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन अधिक शिस्तबद्ध पद्धतीने करता येणार आहे. 'कामगिरीला मान्यता आणि गुणवत्तेला संधी' या सूत्रावर आधारित व्यवस्था सार्वजनिक आरोग्य विभागातील कार्यपद्धतीला नवी दिशा देणारी ठरणार आहे. कामगिरीआधारित प्रशासकीय कार्यसंस्कृतीमुळे अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढण्यास, आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यास आणि लोकाभिमुख आरोग्यसेवा अधिक प्रभावीपणे साकारण्यास महत्त्वपूर्ण योगदान मिळणार आहे.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)